महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

Email ID: itcell-rdd@mah.gov.in
ग्रामविकास विभाग/ मातंक

दूरध्वनी क्र.-०२२-२२०१६७३७.
दिनांक : ३० /०७/२०२५.

तात्काळ
प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व).

विषय:- महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल तयार करण्याबाबत.

संदर्भ:- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचे दि. १९ जुन, २०२५ व दि. ३ एप्रिल, २०२५ रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचे दि. १९ जुन, २०२५ व दि. ३ एप्रिल, २०२५ रोजीचे पत्र माहितीसाठी सोबत जोडले आहे.

उपरोक्त पत्रान्वये, महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगामार्फत सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल विधीमंडळास सादर करावयाचा असल्याने दि. ३१.०३.२०२४ पर्यंत विभागांमार्फत तयार करण्यात आलेल्या बृहत यादी मधील सेवांची संख्या, त्यापैकी अधिसूचित सेवा व त्यापैकी ऑनलाईन सेवा यांची माहिती तसेच सदर सन २०२३-२४ या वर्षात आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी केलेल्या एकूण अर्जाची संख्या, त्यावर विभागामार्फत निकाली काढण्यात आलेले अर्ज व प्रलंबित अर्ज याबाबत महाआयटी महामंडळामार्फत आयोगास सादर करण्यात आलेली माहिती तपासण्याकरिता व त्यात काही बदल असल्यास सुधारित माहिती आयोगास सादर करण्याबाबत विनंती केली आहे.

वरील बाब विचारात घेऊन सर्व जिल्हा परिषदांनी सदर माहिती २ दिवसात शासनास कृपया उपलब्ध करून द्यावी.

Digitally signed by
PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 30-07-2025 16:18:14

(प्रशांत पाटील)
उपसचिव , महाराष्ट्र शासन.

महत्वाचे/कालमर्यादित

आपली सेवा आमचे कर्तव्य

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in **दुरध्वनी :-०२२-२२८३२३४६**

क्र.- आवाह-२०२४/प्र.क्र.५३/मुसेहआ/कक्ष-२ दिनांक : ०३ एप्रिल, २०२५

प्रति,
प्रधान सचिव,
ग्राम विकास व पंचायतराज विभाग,
मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषय:- महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाचा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल तयार करण्याबाबत.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग मार्फत सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल विधीमंडळास सादर करावयाचे असल्याने अधिसूचित सेवांची माहिती तसेच सदर अधिसूचित सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी केलेल्या एकूण अर्जांची संख्या, त्यावर विभागामार्फत निकाली काढण्यात आलेले अर्ज व प्रलंबित अर्ज याची माहिती महाआयटी महामंडळामार्फत आयोगास सादर करण्यात आली आहे.

त्यास अनुसरून आपल्या विभागाची महाआयटी महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

Department	Total Received During 2023-24	Total Disposed	Pending	Pending at User	Pending at Department	Approved	Rejected	On Time Delivery	Not On Time Delivery
Rural Development Dept	34,722	16,383	18,339	0	18,339	2,485	13,898	2,143	14,240

तसेच दि.३१.०३.२०२४ पर्यंत आपल्या मार्फत तयार करण्यात आलेल्या बृहत् यादी (Master List) मध्ये किती सेवा आहेत, त्यापैकी किती सेवा अधिसूचित आहेत व त्यापैकी ऑनलाईन सेवा किती याबाबतची या कार्यालयास उपलब्ध झालेली माहिती खालील पुढील तक्त्यात दिली आहे.

विभाग	उप विभाग	नागरिकांच्या सनदे/ बृहत यादीमध्ये (Master List) समाविष्ट सेवांची संख्या	सनदीमध्ये समाविष्ट सेवांपैकी म.लो.से.ह.अ. अंतर्गत अधिसूचित सेवांची संख्या	अधिसूचित सेवांपैकी ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सेवांची संख्या	२०२३-२४ वर्षात प्राप्त एकूण अर्जांची संख्या	विहित वेळेत सेवा प्रदान करण्यात आलेल्या अर्जांची संख्या	स्त्रोत
ग्रामविकास व पंचायतराज विभाग	ग्रामविकास व पंचायतराज विभाग	१९	७	७	३४७२२	२१४३	MahaIT Dashboard

कृपया सदरील दोन्ही तक्त्यांमधील माहिती आपले स्तरावरून तपासून घ्यावी व त्यात काही बदल असल्यास याच नमून्यात माहिती पुनश्च ७ दिवसाच्या आत आयोगास सादर करावी, ही विनंती. तसेच आपले स्तरावरून ७ दिवसाच्या आत सदरची माहिती तपासणेबाबतचा अहवाल प्राप्त न झाल्यास उपरोक्त माहिती ग्राह्य धरण्यात येवून वार्षिक अहवाल सन २०२३-२४ मध्ये समाविष्ट करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तेव्हा सदरील दोन्ही तक्त्यांमधील अचूक माहिती त्वरेने आयोगास सादर करण्यात यावी, ही विनंती.

मा. मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने,

१

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
सह सचिव,
महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

०३.०२४.